मराठी न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

www.newsexpressmarathi.com | पुणे, पिंपरी-चिंचवड | मंगळवार, दि. 13 जानेवारी 2026 | पान- 1

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२

# महानगरपालिकेची निवडणूक यंत्रणा सज्ज

## मतदान प्रक्रिया सुरळितपणे पार पाडण्यासाठी सूक्ष्म नियोजन करा : आयुक्त श्रावण हर्डीकर

**पिंपरी | प्रतिनीधी**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या सार्वत्रिक निवडणुकीसाठी मतदान १५ जानेवारी रोजी व मतमोजणी १६ जानेवारी रोजी होत आहे. ही मतदान प्रक्रिया पार पाडण्यासाठी महापालिकेची निवडणूक यंत्रणा सज्ज झाली आहे. निवडणूक कामकाजासाठी नियुक्त अधिकारी व कर्मचारी यांनी ही प्रक्रिया सुरळितपणे पार पाडण्यासाठी सूक्ष्म नियोजन करावे, असे निर्देश आयुक्त तथा निवडणूक अधिकारी श्रावण हर्डीकर यांनी दिले.



निगडी प्राधिकरण येथील ग. दि. माडगुळकर नाट्यगृह येथे निवडणूक कामकाजाविषयक आढावा बैठक आयुक्त हर्डीकर यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. आयुक्त हर्डीकर म्हणाले, महापालिका निवडणूक प्रचार कालावधी १३ जानेवारी २०२६ रोजी सायंकाळी ५.३० वाजता संपत आहे. त्यानंतर प्रत्यक्ष मतदान प्रक्रिया संपेपर्यंतचा कालावधी महत्त्वाचा असतो. अशावेळी कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी तसेच कोणताही अनुसूचित प्रकार होऊ नये, यासाठी पोलिस प्रशासनासोबत समन्वय साधून बारकाईने लक्ष ठेवा. याकाळात आचारसंहिता कक्षाने प्रभावीपणे एसएसटी, एफएसटी, व्हीएसटी अशी विविध पथके कार्यरत ठेवावीत. मतदार चिठ्ठ्या मतदारांपर्यंत वाटप करण्याचे काम विहित वेळेत पूर्ण करावे. ईव्हीएम हाताळणी आणि ईव्हीएमची वाहतूक यामध्ये कोणत्याही प्रकारचा हलगर्जीपणा केल्यास नियमान्वये कारवाई करण्यात येईल, असे देखील त्यांनी सांगितले.

मतदान केंद्रावर नियुक्त अधिकारी, कर्मचारी तसेच मतदान प्रक्रियेसाठी आवश्यक असणारे साहित्य मतदान केंद्रावर घेऊन जाण्यासाठी वाहतुकीचे सखोल नियोजन करण्यात यावे. प्रत्यक्ष मतदान प्रक्रिया पार पडत असताना आवश्यक बाबींची माहिती संबंधित अधिकारी, कर्मचारी यांना द्यावी. मतदान प्रक्रिया ही संवेदनशील बाब असून प्रत्येकाने जबाबदारीने काम करावे. मतदानाचा लेखोजोखा अत्यंत बारकाईने संकलित करावा. अभिरूप मतदान (मॉक पोल) व्यवस्थित घेऊन राज्य निवडणूक आयोगाने दिलेल्या नमुन्यानुसार त्याचे प्रमाणपत्र तयार करण्यात यावे, असे निर्देश देखील आयुक्त हर्डीकर यांनी दिले.

अतिरिक्त आयुक्त विजयकुमार खोराटे यांनी महापालिका निवडणुकीच्या जाहीर प्रचाराची मुदत संपल्यानंतर आचारसंहिता भंगाच्या आलेल्या तक्रारींवर कशा प्रकारे कारवाई करावी, याबाबत मार्गदर्शन केले. तर, अतिरिक्त आयुक्त विक्रांत बगाडे यांनी मतदान प्रक्रियेच्या दिवशी प्रत्येक निवडणूक निर्णय अधिकारी कार्यालयाने सादर करावयाच्या कामकाज अहवालाबाबत माहिती दिली. निवडणूक विभागाचे उपायुक्त सचिन पवार यांनी मतदान प्रक्रिया व मतमोजणीच्या अनुषंगाने निवडणूक विभागाच्या वतीने करण्यात आलेल्या तयारीबाबत सादरीकरण केले.

### सायंकाळपासून जाहीर प्रचारावर निर्बंध

» महापालिका निवडणुकीच्या जाहीर प्रचाराची मुदत मंगळवार १३ जानेवारी २०२६ रोजी सायंकाळी ५.३० वाजता संपणार आहे. त्यानंतर उमेदवार, पक्ष यांच्या जाहीर प्रचाराचे बॅनर्स, झेंडे, पोस्टर्स तातडीने हटवण्याचे काम संबंधित क्षेत्रीय कार्यालयांनी करावे. पुढील ७२ तास आपल्या सर्वांसाठी खूप महत्त्वाचे असून या काळात चांगल्या पद्धतीने व नियोजनपूर्वक काम करा, असेही आयुक्त श्रावण हर्डीकर यावेळी म्हणाले.

# प्रचार समाप्तीनंतर सर्व माध्यमांतील निवडणूक जाहिरातींवर बंदी

## राज्य निवडणूक आयोगाचे निर्देश; 13 जानेवारी सायं. 5.30 पासून सर्व माध्यमांवर निर्बंध

**पिंपरी | प्रतिनिधी**

राज्य निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार पिंपरी चिंचवड महापालिकेच्या सार्वत्रिक निवडणुकांसाठी जाहीर प्रचाराची मुदत १३ जानेवारी २०२६ रोजी सायंकाळी ५.३० वाजता संपणार आहे. त्यानंतर इलेक्ट्रॉनिक, मुद्रित तसेच अन्य कोणत्याही प्रकारच्या प्रसारमाध्यमांतून निवडणूकविषयक जाहिराती प्रसिद्ध अथवा प्रसारित करता येणार नाहीत, अशी माहिती महापालिका आयुक्त तथा निवडणूक अधिकारी श्रावण हर्डीकर यांनी दिली.

राज्य निवडणूक आयोगाच्या नियमानुसार मतदान समाप्तीच्या ४८ तास आधी जाहीर प्रचाराची मुदत संपणार आहे.

याबाबत सविस्तर माहिती देताना प्रसार माध्यम प्रमाणन व संनियंत्रण समितीच्या अध्यक्षा तथा महापालिका अतिरिक्त आयुक्त तृप्ती सांडभोर म्हणाल्या की, राज्य निवडणूक आयोगाने महापालिका निवडणूक प्रचार समाप्तीबाबत १३ जानेवारी २०२६ रोजी सायंकाळी ५.३० ही वेळ निश्चित केली आहे. प्रचार समाप्तीनंतर सर्व प्रसारमाध्यमांतील निवडणूकविषयक जाहिरातींना बंदी आहे. त्यानंतर कोणत्याही उमेदवार, राजकीय पक्ष किंवा अन्य व्यक्तीकडून इलेक्ट्रॉनिक, मुद्रित तसेच डिजिटल माध्यमांतून निवडणूकविषयक जाहिराती प्रसिद्ध अथवा प्रसारित करता येणार नाहीत, असे त्यांनी सांगितले.



तर समितीचे सदस्य सचिव किरण गायकवाड यांनी सांगितले की, जाहीर प्रचार समाप्तीनंतर प्रसारमाध्यमांतील जाहिरातींच्या पूर्वप्रमाणनाचा अथवा परवानगीचा प्रश्न उद्भवत नाही. यासंदर्भातील सविस्तर तरतुदी राज्य निवडणूक आयोगाच्या दिनांक ९ ऑक्टोबर २०२५ रोजी निर्गमित करण्यात आलेल्या 'निवडणुकांच्या प्रयोजनार्थ प्रसारमाध्यम संनियंत्रण व जाहिरात प्रमाणन आदेश, २०२५' मध्ये नमूद करण्यात आल्या आहेत. सर्व उमेदवार, राजकीय पक्ष तसेच प्रसारमाध्यमांनी या आदेशांचे काटेकोर पालन करावे, असे आवाहन समितीच्या वतीने किरण गायकवाड यांनी केले आहे.

# शपथ, पथनाट्याद्वारे मतदानाचा जागर

## सफाई सेवकांचा लोकशाही बळकट करण्यासाठी मतदान करण्याचा संकल्प

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी चिंचवड महापालिका सार्वत्रिक निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर शहरात मतदान जनजागृती उपक्रम राबवण्यात येत आहे. या अंतर्गत निगडी सेक्टर २६ येथील डॉ. हेडगेवार भवन येथे सफाई सेवकांसाठी विशेष मतदान जनजागृती कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. महापालिका आयुक्त तथा निवडणूक अधिकारी श्रावण हर्डीकर यांच्या मार्गदर्शनाखाली व अतिरिक्त आयुक्त तृप्ती सांडभोर यांच्या प्रमुख उपस्थितीत आयोजित करण्यात आलेल्या या कार्यक्रमामध्ये शहराच्या स्वच्छतेची धुरा सांभाळणाऱ्या सफाई सेवकांनी उत्स्फूर्तपणे सहभागी होत मतदानाची शपथ घेत लोकशाहीप्रती आपली कटिबद्धता व्यक्त केली.



उपजिल्हाधिकारी तथा निवडणूक निर्णय अधिकारी पल्लवी घाडगे यांच्यासह महापालिकेच्या क्षेत्रीय अधिकारी तथा सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी निवेदिता घार्गे, अविनाश डोईफोडे, जनता संपर्क अधिकारी प्रफुल्ल पुराणिक, सहाय्यक आरोग्य अधिकारी राजू साबळे, मुख्य आरोग्य निरीक्षक दत्तात्रय गणगे, आरोग्य निरीक्षक लक्ष्मण साळवे, विकास शिंदे यांच्यासह सफाई सेवक व नागरिक यावेळी उपस्थित होते.

यावेळी अतिरिक्त आयुक्त तृप्ती सांडभोर म्हणाल्या, स्वीप अंतर्गत शहरामध्ये मतदान जनजागृतीसाठी विविध उपक्रम राबवण्यात येत आहेत. आज सफाई सेवकांमध्ये मतदान जनजागृती करण्यासाठी आयोजित करण्यात आलेल्या उपक्रमाला सफाई सेवकांचा मिळालेला उत्स्फूर्त प्रतिसाद समाधानकारक आहे. स्वच्छतेप्रमाणेच लोकशाहीही टिकवण्याची जबाबदारी आपणा सर्वांची असून, प्रत्येकाने निर्भयपणे मतदानाचा हक्क बजावणे आवश्यक आहे. अशा उपक्रमांच्या माध्यमातून मतदानाबाबत सकारात्मक वातावरण निर्माण होत आहे, असे देखील त्यांनी सांगितले.

उपजिल्हाधिकारी पल्लवी घाडगे म्हणाल्या, लोकशाही टिकवण्यासाठी आणि बळकट करण्यासाठी प्रत्येक नागरिकाचा मतदानातील सहभाग अत्यंत महत्त्वाचा आहे. शहर स्वच्छ ठेवण्यासाठी दिवसरात्र मेहनत घेणारे सफाई सेवक हे समाजाचा महत्त्वाचा घटक असून त्यांनी मतदानाची शपथ घेऊन लोकशाहीप्रती दाखवलेली बांधिलकी प्रेरणादायी आहे. येत्या निवडणुकीत प्रत्येक सफाई सेवकाने आपला मतदानाचा हक्क बजावून लोकशाही सुदृढ करण्यासाठी पुढाकार घ्यावा, असेही त्या म्हणाल्या.

मतदान जनजागृतीसाठी यावेळी पथनाट्याचे सादरीकरण माणिक खटींग, नीलम वाघमारे, अनिकेत शिंदे, शिवप्रसाद पासलकर या कलाकारांनी केले. या पथनाट्याच्या माध्यमातून मतदान न केल्याचे दुष्परिणाम आणि प्रत्येक मताचे लोकशाहीतील महत्त्व अत्यंत प्रभावीपणे मांडण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रफुल्ल पुराणिक यांनी केले.

# स्वतंत्र जिल्हा, सरकारी कार्यालयाचे विकेंद्रीकरण

## शहराच्या सर्वांगीण विकासासाठी दीर्घकालीन उपाययोजनांवर भर

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवडचा स्वतंत्र 'शिवनेरी' जिल्हा, सरकारी कार्यालयाचे विकेंद्रीकरण, मेट्रोचा विस्तार, उच्च दाबाने पाणीपुरवठा आणि कल्याणकारी योजनांसाठी विशेष कृती दल स्थापन करण्यासह विविध आश्वासनांचा जाहीरनामा भारतीय जनता पक्षाने प्रसिद्ध केला आहे.

पिंपरी-चिंचवड शहराचा 'संकल्प शाश्वत विकासाचा' या घोषवाक्यासह शहरासमोरील आव्हाने सोडविण्याचा संकल्प जाहीरनाम्यात केला आहे. २०३२ पर्यंत पिंपरी-चिंचवडसाठी स्वतंत्र लोकसभा मतदारसंघाची मागणी, विधानसभा मतदारसंघाच्या सीमांची पुनर्रचना करून शहराच्या विकासाला राष्ट्रीय स्तरावर प्राधान्य मिळवून दिले जाईल. स्वतंत्र 'शिवनेरी' जिल्ह्याची निर्मिती केली जाईल.




सरकारी कार्यालयाचे विकेंद्रीकरण केले जाईल. एमआयडीसी, महावितरण आणि टपाल विभागाची स्वतंत्र स्थानिक मुख्य कार्यालये शहरात स्थापन केली जातील. शहरातील सहा हजारांहून अधिक गृहनिर्माण संस्थांच्या सोयीसाठी पिंपरी-चिंचवडसाठी स्वतंत्र निबंधक कार्यालयाची मागणी केली जाईल. प्रत्येक प्रभागात एक एकात्मिक केंद्र सुरू केले जाईल. तेथे महापालिका, राज्य व केंद्र सरकारच्या सर्व सेवा एकाच ठिकाणी मिळतील. पिंपरी किंवा मोशी येथे एकात्मिक प्रशासकीय विशेष क्षेत्र (क्लस्टर) उभारले जाईल.

कल्याणकारी योजनांसाठी विशेष कृती दल स्थापन केला जाईल. महापालिका निगडित सेवा 'सारथी' हेल्पलाइनशी जोडून योजनांची माहिती डिजिटल डॅशबोर्डवर पाहता येईल. स्मार्ट सिटी मिशन किंवा शहर परिवर्तन कार्यालयाच्या माध्यमातून तंत्रज्ञानांची जोड देऊन नवनवीन उपक्रम सुरू ठेवले जातील.

### मेट्रो मार्गाचा विस्तार

» मेट्रो मार्गाचा विस्तार केला जाईल. यात निगडी-वाकड-चाकण मार्गाला मंजुरी मिळवून काम सुरू केले जाईल. निगडी ते वाघोली मार्गे चिखली-मोशी-चऱ्होली, निगडी ते चाकण मार्गे तळवडे, पुणे विमानतळ ते आळंदी मार्गे दिघी-चऱ्होली, हिंजवडी टप्पा तीन ते चिखली मार्गे डांगे चौक, पिंपरी कॅम्प-चिंचवड स्टेशन तसेच पुणे विद्यापीठ ते देहूरोड मार्गे औंध-सांगवी-डांगे चौक-रावेत, नाशिक फाटा- भोसरी-चाकण अशा नवीन मेट्रो मार्गाचा विस्तृत प्रकल्प आराखडा (डीपीआर) केला जाईल, असे आश्वासन दिले आहे. भाजपचा हा जाहीरनामा केवळ निवडणुकीसाठी दिलेल्या आश्वासनांचा संच नाही. सुशासन, तंत्रज्ञान, पर्यावरणीय संतुलन आणि नागरिककेंद्रित प्रशासनाचा रोड मॅप आहे, असे आमदार अमित गोरखे म्हणाले.

तरुणांना सरकारी कामात रोजगाराच्या नवीन संधी दिल्या जातील.

'स्मार्ट फॅमिली ॲप' सुरू करण्यात येईल. त्यातून कचरा वर्गीकरण, सौर ऊर्जा वापर आणि वाहतूक शिस्त पाळणाऱ्या कुटुंबांना प्रोत्साहन दिले जाईल. चांगले गुण मिळवणाऱ्या कुटुंबांना मालमत्ता करात सवलत आणि विशेष सन्मान, बक्षिसे दिली जातील. भटक्या श्वानांचे लसीकरण आणि निर्बीजीकरण केले जाईल. रुग्णालयांचे जाळे, नद्यांचे पुनरुज्जीवन केले जाईल, अशी आश्वासने भाजपने दिली आहेत.

# अजितदादांचा संयम ढळलाय!” देवेंद्र फडणवीसांचा थेट प्रत्युत्तर

## गुन्हेगारांची जागा जेलमध्ये, शहरात गुन्हेगारीचे कंबरडे मोडणार; राष्ट्रवादीच्या तिकीट वाटपावरून फडणवीसांनी व्यक्त केला

**पुणे | प्रतिनिधी**

अजितदादा नुसते बोलतात; पण माझे काम बोलते. राज्यात एकमेकांबरोबर काम करत असताना महापालिका निवडणुकीत एकमेकांवर टीका करायची नाही, असे ठरले होते. मी बोलत नाही; परंतु अजितदादांचा संयम ढळला आहे, अशी टीका मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी रविवारी जाहीर मुलाखतीत केली. महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर फडणवीस यांच्या मुलाखतीचे आयोजन करण्यात आले होते. अभिनेत्री गिरीजा ओक यांनी ही मुलाखत घेतली.

या वेळी केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ, उच्च तंत्रशिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील, नगरविकास राज्यमंत्री माधुरी मिसाळ, शहराध्यक्ष धीरज घाटे आदी उपस्थित होते.मेट्रोचा प्रवास मोफत ही घोषणा अजित पवार यांनी जाहिरनाम्यात केली. मात्र, प्रत्यक्षात तिकीट दराचा निर्णय घेणारी ‘फेअर फिक्सेशन कमिटी’ असते. त्यांना तो अधिकार आहे. मीही म्हणेन, की महिलांसाठी विमानप्रवास मोफत आहे, तर जाहीर करायला माझे काय जाते? असा प्रश्न विचारत निवडून येता येत नाही म्हणून काहीही जाहीरनामे काढतात, अशी टीका फडणवीस यांनी केली.

पुण्यातील ३० टक्के बीडीपीमध्ये अतिक्रमण झाले आहे. पुण्यातील टेकड्या हिरावल्या जाणार नाहीत, त्या टिकल्या पाहिजेत, यासाठी ‘शाश्वत विकासाचे धोरण’ केले पाहिजे. त्यासाठी एक समितीही नेमली आहे. त्यांचे काम अंतिम टप्प्यात असून, त्यांच्या शिफारशींवर हरकती सूचना मागवून ती राबवली जाईल, असे फडणवीस यांनी सांगितले.

त्यासाठीचा प्लॅन तयार असून, ३२ हजार कोटी रुपये त्यासाठी खर्च येणार आहे, असे फडणवीस यांनी नमूद केले. तसेच सध्या एक हजार इलेक्ट्रिक बस आहेत आणखी चार हजार इलेक्ट्रिक बस घेणार असल्याचेही ते म्हणाले. होर्डिंग्ज लावून शहर विद्रुप करू नका, असा सल्लाही त्यांनी दिला. .महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर फडणवीस यांच्या मुलाखतीचे आयोजन करण्यात आले होते. अभिनेत्री गिरीजा ओक यांनी ही मुलाखत घेतली.



### म्हणूनच पाडावे लागले उड्डाण पुलाचे काम

» पुण्यात उड्डाण पुलांचे काम बिनडोकपणे केले होते. म्हणूनच ते पाडण्याची वेळ आली; परंतु आता २३ उड्डाण पूल बांधणार आहोत, जे पुढील २५-३० वर्षे पाडण्याची वेळ येणार नाही, असे फडणवीस म्हणाले. पुण्यातील रस्त्यांवर क्षमतेपेक्षा दीडपट वाहने आहेत. त्यामुळे वाहतूक कोंडी कमी करण्यासाठी उड्डाण पुलांशिवाय वाहतुकीसाठी विनाअडथळा ५४ किमीचे बोगदे करण्यात येणार आहेत.

### फडणवीस म्हणाले....

» पुण्यात समाविष्ट झालेली गावे ‘ग्लोबल कॅपॅसिटी सेंटर’ (जीसीसी) म्हणून विकसित होत आहेत. यामुळे मोठ्या प्रमाणात रोजगार निर्मिती होईल.

» पुढच्या पाच वर्षांत ४४ हजार कोटी रुपयांची गुंतवणूक मनपाच्या माध्यमातून करणार आहे.

» सांस्कृतिक क्षेत्रासाठी ‘कल्चर ॲक्शन प्लॅन’ बनवायला हवा.

### रुसलेल्या निष्ठावंतांना सल्ला

» अनेक निष्ठावंतांना उमेदवारी मिळाली नसल्याने ते नाराज झाले आहेत, याविषयी विचारले असता, अनेकदा नाईलाजाने निष्ठावंतांपेक्षा निवडून येणाऱ्याला प्राधान्य द्यावे लागते. त्यामुळे राजकारणात संयम ठेवणे आवश्यक असते, असा सल्ला फडणवीस यांनी दिला. राष्ट्रवादी काँग्रेसने गुन्हेगारांना दिलेल्या तिकिटाबद्दल बोलताना फडणवीस म्हणाले, की त्यांची जागा जेलमध्ये आहे. शहरातील गुन्हेगारीचे कंबरडे मोडणार आहे.

### बहीण-भाऊ एकत्र येण्याचे क्रेडिट देतील का?

» भाऊ- भाऊ एकत्र येण्याचे क्रेडिट मला देतात; पण बहिण-भाऊ एकत्र आले असतील, तर त्याचे क्रेडिट मला देतील की नाही माहिती नाही, असा टोला फडणवीस यांनी ठाकरे बंधू आणि अजित पवार आणि सुप्रिया सुळे यांच्या एकत्र येण्यावरून लगावला.

---

# पुण्याला बनवणार सर्वोत्तम ‘नॉन-कॅपिटल सिटी’; मुरलीधर मोहोळांनी व्यक्त केला विश्वास

## महाराष्ट्र हे देशाचे ग्रोथ इंजिन, तर पुणे हे महाराष्ट्राचे ग्रोथ इंजिन बनले आहे.

**पुणे | प्रतिनिधी**

राजधानीचे शहर नसूनही पुण्याने गेल्या दहा वर्षांत देशाच्या अर्थकारणात अभूतपूर्व योगदान दिले आहे. महाराष्ट्र हे देशाचे ग्रोथ इंजिन, तर पुणे हे महाराष्ट्राचे ग्रोथ इंजिन बनले आहे. आपल्या पुण्याला देशातली सर्वोत्तम नॉन-कॅपिटल सिटी बनवण्याचे स्वप्न भारतीय जनता पार्टी पूर्ण करू दाखवेल, असा विश्वास केंद्रीय राज्यमंत्री आणि पुण्याचे खासदार मुरलीधर मोहोळ यांनी व्यक्त केला.

महापालिका निवडणूक प्रचाराच्या निमित्ताने मोहोळ यांनी प्रभातशी संवाद साधला. त्या वेळी भाजपाच्या संकल्पांविषयी ते बोलत होते. ते म्हणाले, की २०४७ पर्यंत देशाला विकसित करण्यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी कष्ट करत आहेत. महाराष्ट्राला एक ट्रिलियन डॉलरची अर्थव्यवस्था बनविण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस प्रयत्नशील आहेत. या दोन्ही स्वप्नपूर्तीमध्ये पुण्याचा लक्षणीय वाटा असणार आहे. म्हणूनच महापालिकेच्या माध्यमातून पुण्याची सर्वांगीण प्रगती करण्याचा भाजपाचा निर्धार आहे.

मोहोळ म्हणाले, की २०१४ नंतर देशात व राज्यात भाजपाचे सरकार आले. गेल्या अकरा वर्षांच्या मर्यादित कालखंडात पुण्याने विकासाची अनेक शिखरे गाठली. मोदी सरकार पुण्याला भरभरून देत आहे. ठळक उदाहरणे सांगायचे, तरी भली मोठी यादी होईल. मेट्रोचे स्वप्न मोदींमुळे साकारले. प्रदूषण रोखणाऱ्या प्रत्येकी एक हजार इलेक्ट्रिक आणि सीएनजी बस सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेत येत आहेत.



> ‘पुढच्या पाच वर्षांत कात्रज, खडकवासला, खराडी, वाघोली, लोणी काळभोर, सासवडपर्यंत मेट्रो पोहोचवू. पुणे विमानतळापर्यंतही थेट मेट्रोने जाता येईल, असा मार्ग आम्ही प्रस्तावित केला आहे. पुणे विमानतळाचा विस्तार, एम्स रुग्णालय, भारत मंडपमसारखे कन्व्हेन्शन सेंटर, पुणे-मुंबई द्रुतगती मार्गाला समांतर महामार्ग, जीसीसी-डेटा सेंटर हब यासाठी मी दिल्लीतून प्रयत्न करणार आहे. त्यासाठी पुणेकर भाजपाला आशीर्वाद देतील, असा विश्वास आहे.’-
>
> \- मुरलीधर मोहोळ, केंद्रीय राज्यमंत्री

मोदींनी विमानतळ विस्तारीकरण केल्याने, देशातल्या पहिल्या दहा विमानतळांमध्ये पुण्याचा समावेश झाला. पंतप्रधान आवास योजनेतून २६ हजारांपेक्षा जास्त मध्यमवर्गीयांना हक्काचे घर मिळाले. सर्वसामान्यांसाठी अटलबिहारी वाजपेयी रुग्णालय केंद्राच्या मदतीतून सुरू झाले.

पुणे महापालिकेत अवघ्या पाच वर्षात भाजपाने केलेली विकासकामे पुणेकरांनी पाहिली आहेत. पुणेकरांचा कौल प्रचारात स्पष्ट दिसतोय. महापालिकेत पुन्हा भाजपालाच संधी देणार. उज्ज्वल भविष्यासाठी पुण्यात भाजपाच हवी, असे मोहोळ म्हणाले.

# यंदा बारामतीचे प्रदर्शन आठ दिवस!

## राज्यपाल आचार्य देवव्रत यांच्या हस्ते उद्घाटन; बारामतीतील 170 एकरवर अवतरणार आधुनिक कृषी तंत्रज्ञानाचे जागतिक मॉडेल.

**पुणे | प्रतिनिधी**

बारामती अॅग्रीकल्चरल डेव्हलपमेंट ट्रस्ट संचलित कृषी विज्ञान केंद्राचे यंदाचे कृषिप्रदर्शन "कृषक "२०२६ चे आयोजन केले असून १७ ते २४ जानेवारी या कालावधीत प्रदर्शन होणार आहे. यंदा कृषक चा कालावधी वाढला असून आठ दिवस प्रदर्शन भरवले जाणार आहे.कृषिक' हे जगातील सर्वात मोठे प्रात्यक्षिक आधारित कृषी प्रदर्शन यंदा आपल्या ११ व्या वर्षात पदार्पण करत आहे.

१७० एकर प्रक्षेत्रावर प्रदर्शन भरणार असून दरवर्षी देशभरातून अडीच ते तीन लाख शेतकरी या प्रदर्शनाला भेट देतात. राज्यपाल आचार्य देवव्रत यांच्या हस्ते (दि.१७) रोजी उद्घाट्न होणार आहे. ज्येष्ठ नेते शरद पवार, उपमुख्यमंत्री अजित पवार, खासदार सुप्रिया सुळे, खासदार सुनेत्रा पवार, कृषिमंत्री दत्तात्रय भरणे, रोहित पवार यांची उदघाटनाला उपस्थिती असेल, अशी माहिती कृषी विज्ञान केंद्राचे प्रमुख राजेंद्र पवार यांनी पत्रकार परिषदेत दिली. यावेळी संस्थेचे सीईओ निलेश नलावडे उपस्थित होते




### एआयवर सुरू उसाची उत्सुकता

» यंदाच्या कृषी प्रदर्शनात AI तंत्रज्ञान आधारित सुरु उसाचे २०० टन तर खोडवा उसाचे १५० टनाचे प्रत्येशिक शेतकऱ्यांना पाहण्यास मिळणार आहे. शेतकऱ्यांना देश विदेशातील आधुनिक तंत्रज्ञान, संशोधन ,निविष्ठांच्या माहितीचा खजिना, विविध पिकांचे प्रात्यक्षिके पाहण्याची संधी कृषकच्या माध्यमातून मिळणार आहे. प्रदर्शनाचा लाभ घ्यावा, असे आवाहन राजेंद्र पवार यांनी केले आहे. आतापर्यंत २० लाख शेतकऱ्यांनी कृषिकला भेट दिल्याची नोंद आहे.

आधुनिक आणि टिकाऊ होऊ शकते. हा प्रकल्प केवळ तांत्रिक प्रयोग न राहता, भारताच्या कृषी भविष्याची दिशा ठरविण्यास आदर्श मॉडेल ठरत आहे. त्यामुळे शेती क्षेत्रातील रचलेला हा एक नवा इतिहास उलगडून पाहण्याची संधी यंदा कृषिकच्या माध्यमातून शेतकऱ्यांना मिळणार आहे,

यंदाच्या कृषी प्रदर्शनात AI तंत्रज्ञान आधारित सुरु उसाचे २०० टन तर खोडवा उसाचे १५० टनाचे प्रत्येशिक शेतकऱ्यांना पाहण्यास मिळणार आहे. शेतकऱ्यांना देश विदेशातील आधुनिक तंत्रज्ञान, संशोधन ,निविष्ठांच्या माहितीचा खजिना, विविध पिकांचे प्रात्यक्षिके पाहण्याची संधी कृषकच्या माध्यमातून मिळणार आहे. प्रदर्शनाचा लाभ घ्यावा, असे आवाहन राजेंद्र पवार यांनी केले आहे. आतापर्यंत २० लाख शेतकऱ्यांनी कृषिकला भेट दिल्याची नोंद आहे.

### प्रदर्शनातील लक्षवेधी उत्पादन, प्रात्यक्षिके

- » उसाचे प्रतिएकर दोनशे टन उत्पादन व खोडव्याचे दीडशे टन उत्पादन
- » नावीन्यपूर्ण फळझाडांची लागवड, ५०० ग्रॅमपर्यंतचा कांदा
- » विविध पिकांची प्रात्यक्षिकांची रेलचेल
- » हायड्रोफोनिक भाजीपाला तंत्रज्ञान, कलमी भाजीपाला
- » विविध रंगातील स्वीटकॉन, परदेशी कटफ्लॉवरची प्रात्यक्षिके
- » रोबोटिक तन नियंत्रण, स्वतंत्र पशुदालन, भरडधान्य, कृषी संशोधन
- » बियाणे, अवजारे क्षेत्रातील कंपन्यांचे स्टॉल हार्वेस्टींगसह कापणी यंत्रे,
- » गंभीर गुन्ह्यांचा तपास जलदगतीने पूर्ण करून दोषारोपपत्र दाखल
- » प्रक्रिया उद्योग, पॅकेजिंग, ड्रीप, टिश्यूकल्चर क्षेत्रातील नामवंत कंपन्या.

### विज्ञानाची जोड दिल्यास शेती समृद्ध

» राजेंद्र पवार म्हणाले, केव्हीके बारामतीचा एआय ऊस शेती प्रकल्प दाखवितो की, परंपरेला विज्ञानाची जोड दिल्यास शेती समृद्ध, आधुनिक आणि टिकाऊ होऊ शकते. हा प्रकल्प केवळ तांत्रिक प्रयोग न राहता, भारताच्या कृषी भविष्याची दिशा ठरविण्यास आदर्श मॉडेल ठरत आहे. त्यामुळे शेती क्षेत्रातील रचलेला हा एक नवा इतिहास उलगडून पाहण्याची संधी यंदा कृषिकच्या माध्यमातून शेतकऱ्यांना मिळणार आहे,

# शाळांच्या परिसरात तंबाखू विक्रीविरोधात व्यापक मोहीम

## पानटपरीच्या आडून चालणाऱ्या बेकायदेशीर विक्रीचा पर्दाफाश; राजगड पोलिसांनी एकाच दिवशी राबवली व्यापक तपास मोहीम.

**पुणे | प्रतिनिधी**

भोर तालुक्यातील शाळा व शिक्षणसंस्थांच्या परिसरात तंबाखूजन्य पदार्थांची सर्रास विक्री सुरू असल्याची माहिती मिळाल्यानंतर राजगड पोलीस स्टेशन यांच्या वतीने दि. १० रोजी सायंकाळपासून रात्री उशिरापर्यंत व्यापक तपास मोहीम राबविण्यात आली. या मोहिमेत शिंदेवाडी, ससेवाडी फाटा तसेच वेळू या गावांमध्ये एकाच दिवशी सलग कारवाई करून अनेक पानटपऱ्या, हॉटेल्स व किराणा दुकाने तपासण्यात आली.



शिंदेवाडी गावच्या हद्दीत भारती विद्यापीठ शाळेच्या परिसरात तपासणी करत असताना संशयित आरोपी सागर साहेबराव शिंदे हा पानटपरी व्यवसायातून तंबाखूजन्य पदार्थांची विक्री करत असल्याचे आढळून आले. त्याच परिसरात ससेवाडी फाटा येथे वेगवेगळ्या वेळेत केलेल्या कारवाईत निखील प्रकाश गोगावले तसेच लक्ष्मण बाळू गोगावले हे संशयित आरोपी शाळेजवळील परिसरात तंबाखू व सिगारेटची विक्री करताना आढळले.

याच दिवशी वेळू गावच्या हद्दीत जिल्हा परिषद शाळेच्या आवारात आणि आसपास तपासणी मोहीम राबविण्यात आली. या कारवाईत किराणा दुकान व इतर व्यवसायातून तंबाखूजन्य पदार्थांची विक्री करणारे सारिका पांगारे, सोनाली खुंटे, संतोष पांगारे तसेच देवा राम पटेल हे संशयित आरोपी पोलिसांच्या निदर्शनास आले.

शाळेच्या अगदी जवळ विद्यार्थ्यांसाठी प्रतिबंधित असलेल्या परिसरातच ही विक्री सुरू असल्याचे तपासात स्पष्ट झाले. या सर्व कारवायांमध्ये विविध प्रकारचे तंबाखू, सिगारेट, बिडी, पानमसाला आदी पदार्थ जप्त करण्यात आले. शालेय परिसरात विद्यार्थ्यांच्या आरोग्यावर होणारे गंभीर दुष्परिणाम लक्षात घेता पोलिसांनी कोणतीही तडजोड न करता तात्काळ कारवाई केली.

### गैरप्रकारांवर कठोर कारवाई सुरूच राहणार

» संपूर्ण मोहिमेची कायदेशीर प्रक्रिया पोलीस कॉन्स्टेबल गणेश साळुंके व अमोल शेडगे यांच्या फिर्यादीवरून पार पडली. प्रत्यक्ष कारवाईत पोलीस हवालदार मुंढे यांनी सक्रिय सहभाग घेतला, तर पुढील तपासाची जबाबदारी पोलीस हवालदार गायकवाड यांच्याकडे सोपविण्यात आली आहे. ही संपूर्ण मोहीम प्रभारी अधिकारी पोलीस निरीक्षक गवळी यांच्या मार्गदर्शनाखाली राबविण्यात आली. भविष्यातही भोर तालुक्यातील सर्व शाळा परिसरात नियमित तपासणी करून अशा प्रकारच्या गैरप्रकारांवर कठोर कारवाई सुरूच राहणार.